REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# "दंगल आणि इतर कविता" धर्मनिरपेक्ष मूल्य आणि मुस्लीम जाणीवा व्यक्त करणारा काव्यसंग्रह

प्रा. डॉ. शकील शेख
प्रमुख, मराठी विभाग, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,
ता. बार्शी, जि. सोलापूर.

## प्रस्तावना



1960 नंतर मुस्लीम तरूण शिकून पुढं येऊ लागला तेव्हा या मुस्लीम समाजातील शहरी आणि ग्रामीण तरूणांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. ज्या भारत भूमीत त्याच्या अनेक पिढ्या जन्मल्या, वाढल्या आणि याच भूमीत मिसळून गेल्या. त्या भारत भूमीतील मुस्लीमेतराकडून त्याच्या विषयी व्यक्त होणारी परकेपणाची भावना, त्याच्या राष्ट्रभक्तीवर घेतली जाणारी शंका, मंदिर–मस्जिद वाद, बेकारी, दारिद्र्य अशा असंख्य प्रश्नांनी तो अस्वस्थ होऊ लागला आणि या अवस्थतेला त्याने शब्दातून व्यक्त करण्यास सुरू केले हेच ते मुस्लीम मराठी साहित्य होय.

मुस्लीम मराठी साहित्य ही संकल्पना सुरूवातीला 1936 साली सांगलीच्या पै. सय्यद अमीन यांनी मांडली. त्यानंतर ही संकल्पना हळूहळू रूढ होत गेली. मुस्लीम मराठी साहित्य म्हणजे काय ? हे सांगताना प्रा. फकरूद्दीन बेन्नुर म्हणतात, "मुस्लीम मराठी साहित्य याचा अर्थ आम्ही असा करतो की, मराठी मुसलमान लेखकांचे साहित्य आणि महत्त्वाचे म्हणजे 'मुसलमान' म्हणून व 'मराठी माणूस' म्हणून जगत असताना जे ताण–तणाव निर्माण होतात, ते व्यक्त करणारे आणि त्यामधील समताण शोधण्याचा प्रयत्न करणारे साहित्य होय. त्यात मुस्लीम म्हणून मराठी प्रदेशात जगत असताना आणि त्याचबरोबर धर्माने निर्माण केलेले मुस्लीमपण आणि इथल्या सामाजिक वास्तवातून परंपरेने चालत आलेले भारतीय समाजातील गुणविशेष या दोन्हीमुळे इथल्या संवेदनाक्षम लेखकांच्या मनात ज्या जाणीवा निर्माण होतात, जो संघर्ष उभा राहतो त्याचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे मुस्लीम मराठी साहित्य होय"[1]. मुस्लीम म्हणून जगत असताना जे ताण–तणाव निर्माण झाले, जो संघर्ष उभा राहिला तो ताण–तणाव, तो संघर्ष शब्दबध्द करण्यासाठी अनेक मुस्लीम मराठी साहित्यिकांनी कविता या महत्त्वाच्या साहित्य प्रकाराचा आधार घेतला.

मुस्लीमांच्या व्यथा, वेदना, आशा–आकांक्षा, सामाजिक, धार्मिक, राजकीय स्थितीगतीचे चित्रण करण्यासाठी अनेक मुस्लीम मराठी कवी पुढे आले. त्यात एतबार खाँ पठाण, एहतेशाम देशमुख, मिर्झा रफी अहमद बेग, कलीम खान, फ. म. शहाजिंदे, जावेद कुरेशी, सैय्यद अल्लाउद्दीन, अजीम नवाज राही, ए. के. शेख, खलील मोमीन, इलाही जमादार, इब्राहिम खान, फातिमा मुजावर, मुबारक शेख आणि डि. के. शेख अशा प्रमुख कवींचा समावेश होतो.

उस्मानाबादचे कवी डि. के. शेख हे एक सर्जनशील कवी आहेत. त्यांचे 'प्रेमायण', 'सैतानयुगातील कविता', 'पागल पोराच्या भंकस कविता', 'प्रेमाटिका', 'काळीज कळा' तसेच 'दंगल आणि इतर कविता' असे कविता संग्रह प्रसिध्द आहेत.

श्री. शेख यांच्या सुरूवातीच्या कविता संग्रहातून त्यांच्या मनातील उद्रेक अतिशय परखड शब्दात व्यक्त झाला आहे. सुशिक्षित बेकारांची अवस्था त्यांना पाहवत नाही त्यामुळे ते युवकांना पेटून उठण्याचा सल्ला देतात. तर 2015 साली निर्मिती संवाद प्रकाशन कोल्हापूर तर्फे प्रकाशित 'दंगल आणि इतर कविता'

या कविता संग्रहातून भूतकाळातील काही घटनामुळे वर्तमान काळात ज्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे त्याचे चित्रण ते करतात. 'दंगल आणि इतर कविता' या कवितेच्या मध्यवर्ती भूमिकेबद्दल आपले विचार व्यक्त करताना प्राचार्य डॉ. किसन पाटील म्हणतात, "'दंगल आणि इतर कविता' या कवितेची मध्यवर्ती ही आपल्या जात–धर्माधिष्ठित भूतकाळाचे भूत समाजात कसे रूजले आहे, त्यामुळे प्राप्त कालीन वर्तमानातील सभोवताल कसा अंधारमय, अस्वस्थ आणि अभावग्रस्त आहे याची नोंद घेण्याची आहे"[2]. भारताची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्रे निर्माण झाली. त्याला अनेक कारणे आहेत. फाळणी ही एक भूतकालीन घटना पण या घटनेचा आधार घेऊन कित्येक पिढ्यांना परस्पर द्वेषाची रसद पुरविण्याचे कार्य केले जात आहे. भारतातील मुस्लीम हे भारतीय नागरिक आहेत. भारत भूमी जेवढी इतर धर्मीयांची आहे तेवढीच ती मुस्लीमांचीही आहे. पण कधी बाबरच्या नावाने, कधी औरंगजेबच्या नावाने, कधी अफजलखानच्या नावाने तर कधी पाकिस्तानच्या नावाने येथील मुस्लीमांना परकीय म्हणून हिनवले जाते.

भारतीय मुस्लीमांच्या मनात भारताबद्दल रास्त अभिमान, प्रेम आहे. भारतीय मुस्लीमाला देशभक्तीवर कुणी प्रश्नचिन्ह उभा केलेला आवडत नाही. एक वेळा तो 'मुर्ख', 'नालायक', 'हलकट' अशा शिव्या ऐकून घेऊ शकतो पण त्याच्या देशभक्तीवर शंका घेत त्याला कुणी 'पाकिस्तानी' म्हटलेले आवडत नाही. त्यामुळे 'तो मला' या कवितेत कवी लिहितो,

" तो मला 'मुर्ख' म्हणाला
मी हसलो गालातल्या गालात
तो मला 'नालायक' म्हणाला
मी दुर्लक्ष केलं त्याच्याकडे
तो मला 'हलकट' म्हणाला
जाऊ द्या ...... म्हणू द्या ..... मी म्हटलं
मनातल्या मनात
तो मला 'पाकिस्तानी' म्हणाला
क्षणाचाही विलंब न करता
मी त्याच्या एक कानफाटात लगावली "[3]

या देशावर प्रेम आहे म्हणूनच या ठिकाणचा मुस्लीम फाळणीच्या वेळी पाकिस्तानला न जाता भारतात राहिला असे असताना त्याच्या देशभक्तीवर शंका घेणे कितपत योग्य आहे ? या देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मुस्लीमांनीही रक्त सांडले, अनेक पराक्रमी योध्दे, दिग्गज कलावंत, अनेक उत्तम वास्तू मुस्लीमांनी या भारत भूमीला दिल्या याचा विचार न करता पूर्वग्रह दूषीत दृष्टिकोनातून मुस्लीमाकडे का पाहिले जाते असा प्रश्न डि. के. शेख यांना पडतो.

हिंदू–मुस्लीम, दोन्हीकडील मुठभर राजकारणी आपल्या राजकीय फायद्यासाठी, आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी कधी जात, कधी धर्म, कधी प्रांत, कधी हिंदू–मुस्लीमचा मुद्दा पुढे करून सतत देशात असंतोष कसा तेवत राहील हे पाहतात. त्यातून कधी बाबरी मस्जिदच्या नावाखाली तर कधी 'गाय' च्या नावाखाली, कधी फाळणीच्या नावाखाली तर कधी 370 कलमच्या नावाखाली दंगल भडकवली जाते. सर्वत्र दंगली होतात. दंगली पाहणारे, अनुभवणारे व त्यात प्रत्यक्ष सहभागी होणारे दंगलीच्या मागच्या कारणांचा शोध घेत नाहीत. पण कवी डि. के. शेख मात्र दंगली मागच्या कारणांचा शोध घेतात. ते दंगली मागचे वास्तव मांडताना 'खंत' या कवितेत म्हणतात,

" अफवांचं भूत
दंगलीला ऊत
द्वेषाची कडवट गोळी
मानवतेची होळी
हिंदू–मुस्लीम दंगल

चित्र भयंकर ओंगळ "[4]

स्वार्थासाठी अफवा पसरवायच्या आणि त्यातून दंगल घडवून आणायची, हे ओंगळवाणी चित्र समाजात दिसून येते. एके काळी हिंदू–मुस्लीम बंधू भावाने राहात, एक दुसऱ्याच्या सण–समारंभात, जत्रा, यात्रा, उरूसमध्ये सहभागी होत. पण मूठभर स्वार्थी राजकारण्यांनी त्यांच्या वोट बँकसाठी हिंदू–मुस्लीमामधील बंधूभाव संपवून वैरभाव निर्माण केला. ईश्वर–अल्ला, मंदिर–मस्जिदच्या नावाखाली एक दुसऱ्यामध्ये शत्रूत्वाची भावना निर्माण केली ही राजकारण्यांची खेळी वेळीच ओळखणे गरजेचे आहे. हे सांगताना डि. के. शेख म्हणतात,

" मित्रा
ईश्वर – अल्ला, मंदिर – मस्जिद
कधीच मागत नाही बळी
ही तर सगळी
ह्या बगळ्यांचीच खेळी
मग आपण का उगीच
वाहताहोत एकमेकास लाखेली ? "[5]

प्रत्येकाने आपापल्या धर्माच्या–तत्वाचे पालन करताना स्वतःपुरता धर्म ठेवला. सार्वजनिक ठिकाणी हा धर्म जर आणला नाही आणि एक दुसऱ्याने एक दुसऱ्याच्या धर्माचे तत्वज्ञान समजावून घेऊन आदरभाव बाळगला तर भांडण, दंगलीचा प्रश्नच उरणार नाही पण हे आचरणात आणण्याची आवश्यकता आहे. पण तसे घडत नाही. राजकारणी लोक स्वार्थासाठी खेळी करतात आणि त्याला सामान्य माणूस बळी पडतो. ते दंगल घडवितात या दंगलीत सर्वसामान्य हिंदू–मुस्लीम मारले जातात. दंगलीचा फायदा स्वतःच्या पक्षाला कसा होईल हे राजकारणी लोक पाहतात. संधीसाधू आणि धूर्त लोक ही दंगल घडवून आणतात. संधीसाधू आणि धूर्त लोक यांचे एक दुसऱ्याशी लागेबांधे असतात यात मारला जातो सर्वसामान्य. म्हणून डि. के. शेख 'घडविले जाते' या कवितेत म्हणतात,

" कावळे – बगळे
ताटात जेवती
मात्र झुंजविती
तुम्हा आम्हा
जाती धर्माचे त्या
नाही देणे घेणे
सत्ता संपादणे
कार्य त्यांचे "[6]

सत्तेसाठी हपापलेले हे राजकारणी कोणत्या थराला जातील यावर कवीने केलेले हे मार्मिक भाष्य होय. येथे कवीने कावळे–बगळे यांचे रूपक वापरले आहे. या रूपकावर भाष्य करताना किशोर सानप म्हणतात, "कवीने कावळे आणि बगळे ह्या दोन प्रतिमा वापरून अमानुषता, असमानता, दंगल, दहशतीला कसून विरोध केला आहे. कावळे ही प्रतिमा, धर्मांधता निर्माण करणाऱ्या पोटार्थी मुल्ला–मौलवी–काझी–पुजारी–पुरोहिताचा धिक्कार करते. तर बगळे ही प्रतिमा, धर्माचा राजकीय फायद्यांसाठी वापर करणाऱ्या सुखवस्तू आणि राजकीय घराण्यांचा धिक्कार करते"[7]. दंगल घडवणारे भाषा, जात, धर्म, प्रांत अशा कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे राजकारण करून सत्तेसाठी सामान्य माणसाला झुंजवतात. दंगल घडवून आणण्यासाठी तत्कालीन कारण पुरेसे असते. त्यामुळे घरातून बाहेर पडलेला

सर्वसामान्य माणूस घरी परतेलच याची शाश्वती नाही. त्यामुळेच कवी डि. के. शेख 'कधी कोणत्याही वेळी' या कवितेत म्हणतात,

" कधीही कोणत्याही वेळी
कारण असताना किंवा नसतानाही
भर रस्त्यात भर चौकात पडू शकतो तुमचा खून
एकदा घराबाहेर पडलात की
घरी परतालच याची हमी नाही देता येत "[8]

घरातून काही कामानिमित्त बाहेर गेलेला माणूस परतून घरी येईल याची हमी देणे कठीण बनले आहे. कधी काय होईल सांगता येत नाही. समाजात, धर्मात, देशा–देशात मैत्रीभाव वाढावा म्हणून अनेक गोष्टी केल्या जातात. सांस्कृतिक गोष्टींचे आदान–प्रदान, क्रिडा स्पर्धांचे आयोजन. पण अनेकदा अशा गोष्टी सुध्दा द्वेशभाव, दंगल घडविण्यास कारणीभूत ठरतात. खेळ हा खिलाडू वृत्तीनेच खेळला गेला पाहिजे आणि खेळाकडे खिलाडू वृत्तीनेच पाहिले गेले पाहिजे. पण तसे घडत नाही. भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यानच्या क्रिकेटचा सामना हा दंगल घडविण्यासाठी कारणीभूत ठरतो. भारत–पाकिस्तान दरम्यानचा क्रिकेट सामना म्हटले की त्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहते. तो खेळ राहात नाही तर दोन देशा दरम्यानचे युध्दच ठरते. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो आणि 'खेळ खेळा खेळासारखं' या कवितेत म्हणतो,

" मी म्हणतो खेळा साल्यांनो खेळा रे
पण फक्त खेळ खेळा, खेळासारखा
खिलाडू वृत्तीने
एकमेकांच्या जानशी नका रे खेळू ...... "[9]

खेळ खिलाडू वृत्ती निर्माण होण्यासाठी, ती वाढीस लागण्यासाठी खेळला जातो पण त्यातून जर वैरभावच निर्माण होत असेल तर अशा खेळाला मूठमातीच दिलेली बरी.

दंगल सुरू झाली की त्यातून मानवतेला तिलांजली दिली जाते. पूर्वीच्या भांडणांचा राग या दंगलीत काढला जातो. दंगलीतील लोक माणूसकी विसरून एक दुसऱ्यावर तुटून पडतात. तेव्हा दंगलीतील, गर्दीच्या डोक्यात काय चाललेले असते हे सांगताना 'दंगल सुरू झाली की' या कवितेत डि. के. शेख म्हणतात,

" अशा वेळी एकच
एकच गर्दीच्या डोक्यात
हा हिंदू
हा मूसलमान
धरा ........
मारा .......
तोडा .......
फोडा .......
जाळा ........
दंगल सुरू झाली की ....... "[10]

धर्माभिमान सर्वांनी बाळगावा पण स्वतःच्या धर्माबद्दल अभिमान बाळगताना इतरांच्या धर्माचाही सन्मान करावा. पण अनेकदा तसे दिसून येत नाही. त्यामुळे धर्मभावना ही दंगलसाठी कारणीभूत ठरते. या

संदर्भात बोलताना गिरीश मोरे म्हणतात, "'धर्मभावना' दंगलीला कारण ठरू शकते हे नाकारता येत नाही. एखाद्याच्या धर्माभिमान हा दुसऱ्यासाठी दुराभिमान ठरू शकतो तो माणसाच्या ऐक्यासाठी अडथळा धरतो. तो हिंसेला खतपाणी घालतो"[11]. दंगलीचा गैरफायदा घेणारी प्रवृत्ती संधीचीच वाट पाहात असते. गावागावातून, शहराशहरातून एकदा का दंगल उसळली की त्यात गुंड, तथाकथीत शांतीदूत, लहान, थोर, ज्यांना कशामुळे दंगल उसळली ते माहित नाही असे ही महाभाग सहभागी होऊन आपला स्वार्थ साधतात. दंगल भडकवणे सोपे असते पण एकदा का दंगल उसळली की तिच्यावर नियंत्रण मिळविणे खूपच अवघड असते. दंगल उसळल्यानंतर त्यावर राजकारण सुरू होते. दंगल कोणी घडवून आणली यावर आरोप–प्रत्यारोप सुरू होतात. कवी डि. के. शेख नेमके या मुद्यावर बोट ठेवत म्हणतात,

" कोणी म्हणतं हिंदूनी आणली घडवून ही दंगल
म्हणतं कोणी मुसलमानांनी
कोणी म्हणतं बगळ्यांचाच आहे हात
तर काहींनी ठेवलाय ठपका पोलीसांवरती "[12]

दंगल घडविल्या जातात, त्यात सर्वसामान्य मरतात. असे असले तरी कवी आशावादी आहे. कारण आज इतिहासाचे पुनर्लेखन होत आहे त्यामुळे वास्तव इतिहास लोकांसमोर येत आहे. त्यातून सत्य बाहेर येईल आणि पुन्हा एकदा हिंदू–मुस्लीम यांच्यात बंधूभाव निर्माण होईल. डि. के. शेख आपल्या कवितेच्या माध्यमातून मानवतावादाचा, बंधूत्वाचा पुरस्कार करतात डि. के.शेख यांच्या काव्याची महती कथन करताना प्रभाकर शेळके म्हणतात, "त्यांची कविता जगण्याचे, जगविण्याचे भान देणारी कविता आहे. त्यांची कविता मनातली ठसठसणारी वेदना तर मांडतेच, परंतु 'मानवतेचा हात द्या' अशी ही आर्त ललकारी देते"[13]. डि. के. शेख हे या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून समाज बांधवांच्या व्यथा, वेदना तर मांडतातच पण त्याचबरोबर मानवतेचा संदेश ही देतात.

'दंगल आणि इतर कविता' या काव्य संग्रहातील कविता साध्या सोप्या भाषेत लिहिल्या गेल्या आहेत. अनेक ठिकाणी दख्खनी शब्द येतात त्यामुळे कवितेचा आशय सौंदर्य अधिक परिणामकारक ठरतो. शेख यांच्या लेखनशैली संदर्भात बोलताना श्री. मुकेश मोहिते म्हणतात, "एकंदरीत डि. के. शेख यांची 'दंगल आणि इतर कविता' या संग्रहातील कविता साधी, सोपी शब्दकळा लेवून, मुक्त छंदामध्ये अवतरत असली तरीही आणि प्रतिमा, प्रतिकांचा तिला सोस नसला तरीही थेट हृदयाशी भिडते. वाचकमन अंतर्मुख करते आणि वाचकांची मनोभूमिका नितळ, स्वच्छ व पारदर्शी करण्याचा यशस्वी प्रयत्न करते"[14]. डि. के. शेख आपल्या मनातील विचार, भाव, 'दंगल आणि इतर कविता' मधून वाचकांसमोर साध्या सोप्या भाषेत मांडतात. त्यातून वाचक अंतर्मुख होत जातो यात तिळमात्र शंका नाही.

## संदर्भ ग्रंथ

1 बेन्नुर फकरूद्दीन, 'चौथे अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषण', विचारमंथन (संपा. नदाफ अजीज), एकता प्रकाशन, सोलापूर, प. आ. 2002, पृ. क्र. 47.
2 पाटील किसन, 'दंगल आणि इतर कविता', 'जनसंस्कृतीच्या मानवीय जाणिवेची कविता', अक्षरवैदर्भी, फेब्रुवारी 2016, पृ. क्र. 26.
3 डी. के. शेख, 'दंगल आणि इतर कविता', निर्मिती संवाद, प्रॉ. प्रा. लि., कोल्हापूर, प. आ., एप्रिल 2015, पृ. क्र. 60.
4 तत्रैव, पृ. क्र. 17.
5 तत्रैव, पृ. क्र. 34.
6 तत्रैव, पृ. क्र. 22.
7 सानप किशोर, 'दंगल आणि इतर कविता', 'माणूसपणावर श्रध्दा असलेली कविता', अक्षर पेरणी, जानेवारी, फेब्रुवारी, 2016, पृ. क्र. 09.
8 डी. के. शेख, 'दंगल आणि इतर कविता', 'उनि' पृ. क्र. 32.

LBP PUBLICATION

9 तत्रैव, पृ. क्र. 24.
10 तत्रैव, पृ. क्र. 18.
11 मोरे गिरीष, 'दंगल आणि इतर कविता', 'उनि' प्रस्तावना पृ. क्र. 10.
12 डी. के. शेख, 'दंगल आणि इतर कविता', 'उनि' पृ. क्र. 21.
13 शेळके प्रभाकर, 'आत्मानुभूतीच्या जखमा उजागर करणारी कविता', 'प.', 'वाटसरू', 1 ते 15 जानेवारी 2016, पृ. क्र. 61.
14 मोहिते उमेश, 'मुस्लीम जाणीव', 'अभिव्यक्त करणारी कविता', 'दंगल आणि इतर कविता', 'प. वाटसरू', डिसेंबर 2017, जानेवारी, फेब्रुवारी 2018, पृ. क्र. 09.

LBP PUBLICATION